नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने संमत केलेला ठराव क्र.४० दि.२९.५.२०१७ विखंडीत करण्यासाठी निलंबित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: नामनपा-२०१७/प्र.क्र.४०१/नवि-२४,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक:- १४ जून, २०१९

<u>संदर्भ</u> :- आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांचे पत्र क्र.नावाशमनपा/साप्रवि / आस्था-१/१३४१९/२०१७/दिनांक ६.१२.२०१७

<u>प्रस्तावना</u> :-

श्री. के.एस. दासरे, लिडींग फायरमन, अग्निशमन विभाग नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हे कामावर सततत गैरहजर राहत असल्यामुळे त्यांना महानगरपालिकेने त्यांच्या दि.१८.४.२०१३ च्या आदेशान्वये निलंबित केले होते.

२. श्री. दासरे यांच्याविरुध्द सुरु करण्यात आलेल्या विभागीय चौकशीनुसार चौकशी अधिकारी यांनी त्यांचा चौकशी अहवाल सादर केलेला आहे. चौकशी अहवालानुसार त्यांच्याविरुध्द दोषारोप सिध्द होत असल्यामुळे नांदेड वाघाळा महानगरपालिकेने त्यांच्या दि.२३.४.२०१४ च्या आदेशान्वये श्री. के. एस . दासरे, लिडींग फायरमन, यांना सेवेतुन बडतर्फ केले. सदर बडतर्फीच्या आदेशाविरुध्द श्री. दासरे यांनी कामगार न्यायालय, नांदेड येथे अर्ज दाखल केला. कामगार न्यायालय, नांदेड यांनी त्यांच्या दि. २९.७.२०१५ च्या आदेशान्वये श्री. दासरे यांच्या बडतर्फीच्या आदेशास स्थगिती दिली.

३. सदर स्थगिती आदेशाविरुध्द महानगरपालिकेने औदयोगिक न्यायालय, जालना येथे अपिल दाखल केले. औदयागिक न्यायालय, जालना यांनी त्यांच्या दि.६.१०.२०१५ च्या आदेशान्वये महानगरपालिकेचे अपिल खारिज केले. औदयोगिक न्यायालय, जालना यांच्या दि.६.१०.२०१०५ च्या आदेशाविरुध्द महानगरपालिकेने उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे रिट याचिका दाखल केली.

४. प्रस्तुत रिट याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने त्यांच्या दि.५.१२.२०१५ च्या आदेशान्वये महानगरपालिकेचे दि.२३.४.२०१४ चे बडतर्फीचे आदेश व औदयोगिक न्यायालय, जालना यांचे दि.६.१०.२०१५ चे आदेश रद्द केले. तसेच महानगरपालिकेने श्री. दासरे यांचे बाबतीत शिक्षेबाबतचे नवीन सुधारीत आदेश काढण्याबाबत आदेशित केलेले आहे.

५. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महानगरपालिकेने त्यांच्या दि.९.१२.२०१५ च्या सुधारीत आदेशान्वये श्री. दासरे, लिडींग फायरमन यांना खालील नमुद केलेली शिक्षा बजावुन अग्निशमन विभागात सेवेत पुन: स्थापित केलेले आहे:

अ) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ४८(१) नुसार श्री. दासरे हे दि.२१.२.२०१३ ते दि.१७.४.२०१३ या कालावधीत निलंबनापुर्वी अनाधिकृतपणे कामावर गैरहजर असल्यामुळे हा कालावधी विनावेतन धरण्यात यावा.

ब) श्री. दासरे यांचा दि.२३.४.२०१४ ते दि.८.१२.२०१५ हा बडतर्फीचा कालावधी हा निलंबन कालावधी म्हणुन ग्रहीत करण्यात यावा.

क) श्री. दासरे, लिडींग फायरमन यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६(२)(ब) मधील तरतुदीनुसार त्यांच्या ३ वेतनवाढी कायमस्वरुपी रोखुन ठेवण्यात येत आहेत.

६. उपरोक्त शिक्षेच्या विरुध्द सन्माननीय सदस्यांमार्फत स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्यानुसार स्थायी समितीने श्री. दासरे यांच्याबाबतीत खालील ठराव क्र. ४० दि.२९.५.२०१७ संमत केलेला आहे.

"श्री. दासरे यांना अनुज्ञेय असलेली रजा मान्य करुन त्यांचा निलंबन काळ हा कर्तव्यकाळ म्हणुन गृहीत धरुन त्यांच्या ३ पैकी एकच वेतनवाढ एक वर्षाच्या कालावधीसाठी रोखुन ठेवण्याचा ठराव संमत केलेला आहे."

७. श्री. के. एस. दासरे , लिडींग फायरमन, हे विभागीय चौकशीमध्ये दोषी आढळुन आले असल्यामुळे त्यांना सेवेतुन बडतर्फ करण्यात आलेले होते. तथापि, उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांचे शिक्षेबाबतचे सुधारीत आदेश निर्गमित करुन त्यांचा बडतर्फीचा कालावधी महानगरपालिकेने निलंबन कालावधी म्हणून नियमित करुल त्यांना सेवेत पुन:स्थापित केलेले आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या स्थायी समितीने संमत केलेला उक्त ठराव क्र. ४० हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विसंगत असल्यामुळे तो महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ४५१ अन्वये, विखंडित करण्याबाबतची विनंती आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांनी दिनांक ६.१२.२०१७ च्या पत्रान्वये शासनास केलेली आहे.

३. उपरोक्त नमूद बाबीं विचारात घेऊन सदरचा ठराव क्र. ४० दिनांक २९.५.२०१७ निलंबित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केलेल्या वस्तुस्थितीनुसार नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या स्थायी सभेने संमत केलेला ठराव क्र. ४० दि.२९.५.२०१७ हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विसंगत असल्यामुळे सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४५१ (१) नुसार विखंडित करण्यासाठी प्रथमत: निलंबित करण्यात येत आहे.

सदर ठराव निलंबनाप्रकरणी संबंधितांना अभिवेदन करावयाचे असल्यास त्यांना निलंबन आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत शासनास अभिवेदन करणे आवश्यक आहे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०६१४११४७२७११२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradeep Patil

Digitally signed by Pradeep Patil
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=05334a0514755cf2d85a6ca44c91e73cfa81323e994582a4a27e428d216ef701, cn=Pradeep Patil
Date: 2019.06.14 11:34:32 +05'30'

(प्रदीप पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधानसचिव,मंत्रालय,मुंबई-३२
२) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.
३) नगर सचिव तथा प्राधिकृत अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
४) प्रधान सचिव, (नवि-२), नगर विकास विभाग, यांचे स्वीय सहाय्यक
५) उपसचिव, यांचे स्वीय सहाय्यक, नवि-२४,नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६) निवड नस्ती (नवि-२४) (२ प्रती)